20/7/1990

हर जोर जुल्म के टक्कर मे, संघर्ष हमारा नारा है!!

केंद्रीय कायद्यासाठी

# राज्यव्यापी शेतमजूर परिषद

## रविवार दिनांक २२ जुलै ९० रोजी सकाळी १० वाजता
## सीमंत मंगल कार्यालय, औरंगपूरा, (अप्सरा सिनेमाजवळ), औरंगाबाद

**ग्रामीण कष्टकरी भावा-बहिणींनो !**

आपण रात्रंदिवस काबाडकष्ट करतो; तरीही आपल्याला दोन वेळेची भाकरी मिळत नाही. मग पोराबाळांचे शिक्षण, रहायला घर, औषधपाणी, कपडालत्ता याबाबत तर आपण विचारच करायचा नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे आपण करत असलेल्या कष्टाचा मोबदला आपल्याला मिळत नाही – तो आपल्याला मिळू दिला जात नाही.

ग्रामीण धनदांडग्यांचे विरोधात आपल्याला नेहमीच झगडा करावा लागला आहे आणि आपण तो केला देखील.

ग्रामीण कष्टकऱ्यांच्या चळवळीमुळेच महाराष्ट्र सरकारला रोजगार हमी कायदा करावा लागला. मात्र आपल्याला आपली ही चळवळ अधिक व्यापक करावी लागणार आहे. तमाम ग्रामीण कष्टकऱ्यांना आपल्याला एका झेंड्याखाली आणावे लागणार आहे. आपली ताकद एकवटवावी लागणार आहे तरच खऱ्या अर्थाने आपल्याला न्याय मिळणार आहे.

आपल्या कष्टाचा पुरेपुर मोबदला मिळावा व ग्रामीण धनदांडग्यांपासून आपले संपूर्णतः संरक्षण व्हावे म्हणून आपल्या साठीच्या कायद्याची आपण सातत्याने मागणी करत आहोत.

या मागणीच्या पाठपुराव्यासाठी देशभरातील शेतमजूर संघटनांच्या प्रतिनिधींची राष्ट्रीय परिषद नुकतीच दिल्ली येथे झाली आणि त्या परिषदेतही आपण या मागणीचा पुनःरुच्चार केला व ही आपली मागणी पदरात पडेपर्यंत देशभर संघर्ष व प्रबोधनाचे माध्यमातून शेतमजूरांना संघटीत करण्याचा निर्धार करण्यात आला. या शेतमजूर कायद्यात प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश असावा असा आपला आग्रह असणार आहे.

★ कामाचा अधिकार ★ किमान वेतनाची काटेकोर अमलबजावणी ★ संघटना करण्याचा अधिकार ★ शेतमजूरांची नोंदणी ★ तंटे मिटविण्यासाठीची स्वतंत्र यंत्रणा ★ स्त्री पुरुषांना समान वेतन ★ साठ वर्षानंतर पेन्शन योजना ★ बाळंतपणात किमान तीन महिन्याचे वेतन ★ संरक्षण विमा, सहभागी भविष्य निर्वाह निधी इत्यादीं सामाजिक सुरक्षिततेच्या योजना ★ शेतमजुरांसाठी E.S.I. सारख्या वैद्यकीय सेवा ★ कामावर असताना दुर्घटना घडल्यास नुकसान भरपाई ★ यंत्रावर काम करणारासाठी सुरक्षा उपाय ★ प्रशासनात शेतमजुरांसाठी स्वतंत्र विभाग ★ आणि या कायद्यांचे काटेकोर पालन होते की नाही हे पाहण्यासाठी शेतमजूर संघटनांच्या प्रतिनिधींना घेवून राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर वैधानिक समित्यांची स्थापना.

याच राष्ट्रीय परिषदेत कायदा लवकर व्हावा यासाठीं देशभरातून शेतमजूरांनी आवाज उठवला पाहिजे आणि म्हणून राज्या राज्यात शेतमजूरांच्या परिषदा घेण्याचा निर्णय झाला. या निर्णयाचा भाग म्हणूनच आपण महाराष्ट्रात **केंद्रीय शेतमजूर कायदा संघर्ष परिषद** रविवार दिनांक २२ जुलै ९० रोजो औरंगाबादेतील सीमंत मंगल कार्यालय येथे सकाळीं १० तें सायंकाळीं ५ वाजेपर्यंत आयोजित केलीं आहे. या शेतमजूर परिषदेत केंद्रीय शेतमजूर संघटनांचें प्रमुख पदाधिकारीं तर उपस्थित राहणार आहेत त्याचबरोबर महाराष्ट्र, बिहार व पश्चिम बंगालच्या मजूर मंत्र्यांनादेखील या परिषदेसाठीं मुद्दाम निमंत्रीत केले आहे. या परिषदेस महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील प्रतिनिधीं उपस्थित राहणार असल्याने आपण आपल्या भागातील कार्यकर्त्यांसह मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.

आपले

❊ भारतीय शेतमजूर युनियन ❊ शेतकरी शेतमजूर पंचायत
❊ औरंगाबाद जिल्हा शेतमजूर युनियन ❊ महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन
❊ महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन ( लाल बावटा )
❊ युवक क्रांती दल ❊ लोकसमिती

---

(आशिष प्रिंटर्स, औ'बाद)